Loknayak 08.09.2025 :Copy of Layout 1 9/7/2025 11:04 PM Page 1

बीड ।जालना। छत्रपती संभाजीनगर । पुणे । अहमदनगर → आर. एन. आय. एमएएच /एमएआर / २०१४/ ५८०९० → सोमवार दि.८ सप्टेंबर २०२५ → वर्ष १० वे → अंक –१५६ → पाने ४ → किंमत २ रु

Beed /Jalna/ Chatrapati Sambhajinagar / pune / Ahamadnagar → RNI : Regd.No.MAHMAR/2014/58090 → Monday Date:8 Septmber 2025 → 10 th Year → 156 th Paper → Pages : 4 → Price - 2 Rupees

बीडचा
महाराष्ट्राचा महानायक
# लोकनायक
संपादक –भारत गायकवाड

## आता वडार बनणार ज्वालामुखी



आम्ही दगड फोडून स्वप्नं घडवली,
रस्ते घडवले, धरणं उभी केली,
शिवरायांचे गड बुरुज आम्ही घडवले,
देशाच्या प्रगतीसाठी छातीची कातडी सोलून ओले झाले!
पण...
ज्यांनी देश बांधला, देव घडवले,
त्यांच्या घरात भुकेचे सावट वाढले,
गावकुसाबाहेर पालावरची रात्र आजही झोपवते,
आधारकार्डाची नोंदही उशिरा होणं आम्हालाच शोभतं!
स्वातंत्र्याचा सूर देशभर गाजला,
१५ ऑगस्ट १९४७ रोजी तिरंगा फडकला,
पण आमचं बंधन मात्र अजूनही घट्ट होतं,
कारण ३१ ऑगस्ट १९५२ ला आम्हीच खरं स्वातंत्र्य पाहिलं!
इंग्रजांच्या साखळ्या तुटल्या,
पण राज्यकर्त्यांच्या डावपेचात पुन्हा आम्ही अडकलो,
ङ्गविमुक्त जाती नावाचा प्रवर्ग घडवून
आम्हालाच इतरांच्या सावलीत गाडून टाकलं!
आम्ही आजही रस्त्याचे मजूर, दगड खाणीचे गुलाम,
मातीकामाचे शिल्पकार, रेल्वे बोगद्यांचे स्वप्नांचे कारागीर,
देशाच्या विकासासाठी ज्यांनी हाडं झिजवली,
तेच आज आपल्या हक्कासाठी फिरताहेत दरबदर!
८० लाखांचा समाज असूनही
एकही आमदार, खासदार जन्माला नाही आला,
ही आकड्यांची शोकांतिका नाही का?
हा अपमान नाही का?
नेते तोंडाने समाजप्रेम गातात,
पण खुर्चीच्या खेळात एकी विसरतात,
आजही आमचं आरक्षण ताटातलं कणसुद्धा,
इतरांच्या ताटात गिळलं जातं!
पण आता नाही सहन होणार,
ही काळ्या दगडाची रेघ आहे,
रक्ताने भिजलेल्या इतिहासाची आठवण,
आज या अंगारावर क्रांतीचे सूर लिहायचे आहेत!
भाऊनो, बहिणींनो, उठून उभं राहा,
या काळ्या दगडावर न्यायाची रेघ कोरा,
ही केवळ कविता नाही,
ही लढ्याची गर्जना आहे, ही क्रांतीची धग आहे!
आता हात मुठीत घट्ट होऊ दे,
डोळ्यांत अंगार, हृदयात ज्वाला उसळू दे,
आम्ही बांधलंय देशाचं आयुष्य,
आता आमचं भविष्य आम्हालाच मिळवू दे!
हे राज्यकर्त्यांनो, ऐका ही वीजेची गर्जना,
आमच्या इतिहासाचा हा क्रोधाचा आविष्कार,
आता नाही आम्ही हात पसरवणार,
आम्ही स्वतःच्या हक्काचं रणांगण सजवणार!
काळ्या दगडाची रेघ आज लाल होणार,
या अन्यायाच्या डोंगराला खिंडार पाडणार,
आरक्षण आमचं जन्महक्काचं किल्ला आहे,
तो किल्ला आम्हीच पुन्हा ताब्यात घेणार!

कवी रमेश जेठे सर
संपादक, शिर्डी एक्स्प्रेस
मो.९९६०८५४७६५

# लक्ष्मण हाके पुन्हा एकदा गेवराईत
## आ.विजयसिंह पंडितांविरुध्द दंड थोपटले

**लोकनायक वृत्तसेवा** – ओबीसी नेते प्रा.लक्ष्मण हाके आणि गेवराईचे राष्ट्रवादी काँग्रेसचे आ.विजयसिंह पंडीत यांच्या समर्थकांमध्ये दि.२६ ऑगस्ट रोजी जोरदार राडा झाला होता. प्रा.हाके आपल्या समर्थकांसह गेवराईतून जात असताना पंडित समर्थकांनी जोरदार घोषणाबाजी करत त्यांच्या गाडीवर चप्पल भिरकावली होती. त्यावेळी आक्रमक झालेल्या हाकेंनी गाडीतून बाहेर येत दंड थोपटून पंडित समर्थकांना आव्हान दिले होते. त्यानंतर रविवारी पुन्हा एकदा गेवराईत त्याच छत्रपती शिवाजी महाराज चौकात प्रा. लक्ष्मण हाके यांनी जोरदार शक्तीप्रदर्शन करत रॅली काढली. तसेच दंड थोपटून त्यांनी आ.विजयसिंह पंडित यांना एक प्रकारे आव्हान देऊन जोरदारपणे टीका केली. प्रा.हाके यांच्या जोरदार शक्तीप्रदर्शनमुळे आ.पडित समर्थक कार्यकर्ते चांगलेच संतापले आहेत. प्रा.हाके-पंडित यांचे समर्थक पुन्हा आमने सामने आले तर मोठा राडा होण्याची शक्यता



लक्षात घेऊन पोलीसांनी मोठा बंदोबस्त तैनात केला होता. लक्ष्मण हाके यांच्या उपस्थितीत गेवराई शहरात भव्य रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये हजारो ओबीसी कार्यकर्ते सहभागी झाले होते. काही दिवसांपूर्वी गेवराईत लक्ष्मण हाके आणि आ.विजयसिंह पंडित यांच्या समर्थकांमध्ये वाद झाला होता. प्रा.लक्ष्मण हाके यांनी रेवकी-देवकी व आगर नांदूर याठिकाणी देखील भेट दिली. गेवराई येथे त्यांनी आ.पंडित व मनोज जरांगे पाटील यांचा चांगलाच समाचार घेतला. प्रा.लक्ष्मण हाके यांच्या स्वागतासाठी मोठया संख्येने ओबीसी समाज बांधव उपस्थित होते. **पान २ वर**



**लोकनायक वृत्तसेवा** – नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांची नुकतीच भारतीय जनता पक्षाच्या जिल्हा उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. या प्रित्यर्थ ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक रमेशराव गंगाधरे यांनी त्यांचे अभिष्टचिंतन केले. यावेळी जलील भाई, सेवानिवृत्त नायब तहसीलदार मच्छिंद्र भालेराव, मधुकर धांडे, आणि कांडेकर यांची उपस्थिती होती.

## संदल आणि मॅरेथॉनमध्ये डीजे चालतो मग गणेश विसर्जनालाच नियम का लावता – परशुराम गुरखुदे

**लोकनायक वृत्तसेवा** – काल शनिवार रोजी संपूर्ण महाराष्ट्रात गणेश विसर्जन मोठ्या भक्ती भावाने संपन्न झाले. आपल्या लाडक्या गणरायाला निरोप देताना सगळ्यांच्याच डोळ्यात अश्रू पाहायला मिळाले. यंदा मात्र बीड जिल्ह्यातील जनता आपल्या लाडक्या गणरायाला वाजत गाजत निरोप देऊ शकली नाही आणि त्याला कारण ठरले बीडचे पोलीस अधीक्षक. संपूर्ण महाराष्ट्रात मोठ्या आवाजात डीजे वाजवण्याला बंदी आहे, मात्र नियमांचे पालन करून जर कोणी डीजे वाजवत असेल तर त्याला कायद्यात अडकवण्याचे काहीच कारण नाही. मात्र ज्या



पोलीस अधीक्षकांना संदल आणि स्वतः आयोजित केलेल्या मॅरेथॉन मध्ये डीजे चालतो त्याच पोलीस अधीक्षकांना नेमक्या गणेश विसर्जनाच्या वेळी डीजेचे वावडे का निर्माण झाले ? असा सवाल द्वारकाधीश मित्र मंडळाचे सर्वेसर्वा परशुराम गुरखुदे यांनी केला आहे. पोलीस अधीक्षक यांच्या या निर्णयामुळे काल बहुतांश गणेश मंडळाच्या वतीनेपोलीस अधीक्षकांच्या या निर्णयावर नंतर खेद व्यक्त केला.पोलीस अधीक्षक यांनी सर्वधर्मसमभाव जपणे गरजेचे आहे. कायदा आणि सुव्यवस्था राखणाऱ्या पोलीस **पान २ वर**

## स्वराज्य जनजागृती परिषदेच्या कार्यकर्त्यांचा मराठवाडा विभागीय मेळावा
### १४ सप्टेंबर रोजी मोठ्या संख्येने उपस्थित रहा – ॲड. अजित देशमुख



**लोकनायक वृत्तसेवा** – सामाजिक स्तरावर मोठ्या प्रमाणात काम करण्यासाठी स्वराज्य जनजागृती परिषदेची स्थापना झाली आहे. या माध्यमातून लोकशिक्षण आणि लोकजागृतीसाठी कार्यकर्त्यांची फळी तयार करायची आहे. त्याच बरोबर भ्रष्टाचाराला विरोध देखील कायम ठेवायचा आहे. परिषदेच्या कार्यकर्त्यांचा मराठवाडा विभागीय स्तरावरील मेळावा रविवार दिनांक १४ सप्टेंबर २०२५ रोजी आयोजित केला असून या मेळाव्याला सर्व स्तरातील कार्यकर्त्यांनी आवर्जून उपस्थित रहावे, असे आवाहन स्वराज्य जनजागृती परिषदेचे अध्यक्ष ॲड. अजित एम. देशमुख यांनी केली आहे.दिनांक १४ सप्टेंबर रोजी हा मेळावा बीड येथील समर्थ मंगल कार्यालय, नगर रोड, बीड या ठिकाणी आयोजित करण्यात आला आहे. केवळ जिल्हास्तरावर नव्हे तर विभाग स्तरावर हा मेळावा आयोजित करण्यात **पान २ वर**




## डिजीटल मीडिया पत्रकार परिषदेच्या राज्यस्तरीय अधिवेशनाचा एस.एम.देशमुख यांनी घेतला आढावा

**लोकनायक वृत्तसेवा** – अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या डिजिटल मीडिया परिषदेचे राज्यस्तरीय अधिवेशन दिनांक १४ सप्टेंबर २०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे होत आहे. या अधिवेशनाच्या पूर्वतयारीचा आढावा अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांनी शुक्रवारी घेतला.छत्रपती संभाजीनगरातील क्रांतीचौक जवळील संत एकनाथ नाट्य मंदिरात दिनांक १४ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी दहा वाजता डिजिटल मीडिया परिषदेच्या राज्यस्तरीय अधिवेशनास सुरुवात होणार आहे. मान्यवरांच्या हस्ते या अधिवेशनाचे उद्घाटन होणार



आहे. अधिवेशनाच्या यशस्वीतेसाठी मराठी पत्रकार परिषदेची छत्रपती संभाजीनगर शाखा प्रयत्नशील आहे.प्रिंट मीडियाबरोबरच डिजिटल मीडियानेही सध्या माध्यम क्षेत्रामध्ये मोठी झेप घेतली आहे. म्हणून अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेने पत्रकारांसाठी डिजिटल मीडियाच्या रूपाने इलेक्ट्रॉनिक मीडियातील पत्रकारांसाठी व्यासपीठ स्थापन केले आहे. डिजिटल मीडियातील पत्रकारांसाठी अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेने पहिल्यांदाच राज्यस्तरीय अधिवेशन छत्रपती संभाजीनगरात आयोजित केले आहे. **पान २ वर**












Loknayak 08.09.2025 :Copy of Layout 1 9/7/2025 11:04 PM Page 2



# हजारोंच्या उपस्थितीत मोरारी बापू यांच्या रामकथा पर्वाला प्रारंभ चिंतामणी बाजार समितीचा परिसर दुमदुमला

यवतमाळ लोकनायक वृत्तसेवा : कथापर्वाची वेळ जसजशी जवळ येत होती, तसतसे भाविकांचे लोंढे कार्यक्रमस्थळी पोहोचत होते. महिला, पुरुष, ज्येष्ठ नागरिकांची या ठिकाणी मांदियाळी होत होती. सर्वांना कथा ऐकण्याची उत्कंठा लागली होती. टाळमृदंगाच्या गजरात रामकथेची पोथी मंचावर आणली गेली. काही वेळातच कथापर्वाला सुरुवात झाली. निमित्त होते, प्रसिद्ध आध्यात्मिक संत आणि प्रख्यात कथाकार मोरारी बापू यांच्या रामकथा पर्वाचे. यवतमाळ येथील दारव्हा रोडवरील भोयर बायपासजवळील चिंतामणी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रशस्त अशा मंडपात १४ सप्टेंबरपर्यंत सकाळी ९:३० ते दुपारी १:३० वाजतापर्यंत कथापर्व आयोजित करण्यात आले आहे. यासाठी देशभरातील भक्तगण दाखल झाले आहेत. शनिवारी सायंकाळी कथापर्वाला प्रारंभ झाला. कथापर्वाचे यजमान डॉ. विजय दर्डा, राजेंद्र दर्डा आणि दर्डा परिवाराने चिंतामणी बाजार






समितीच्या प्रवेशद्वारावरून टाळमृदुंगाच्या गजरात रामकथेची पोथी डोक्यावर ठेवून शोभायात्रेद्वारे मुख्य मंचावर आणली. शोभायात्रा समितीच्या प्रमुख सीमा दर्डा यांनी नेतृत्व केले. शोभायात्रेत महिलांसह बालगोपाळ सहभागी झाले होते.याप्रसंगी आंतरराष्ट्रीय ख्यातीचे जैन आचार्य पूज्य डॉ. लोकेश मुनीजी, अखिल भारतीय चतु:संप्रदायचे अध्यक्ष महामंडलेश्वर डॉ. संगीतकृष्ण सावरिया बाबा, राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, आदिवासी विकास मंत्री प्रा.डॉ. अशोक उईके, खासदार संजय देशमुख, माजी मंत्री शिवाजीराव मोघे, आमदार बाळासाहेब मांगूळकर, आमदार संजय देरकर, माजी आमदार वामनराव कासावार, आयोजन समितीचे कार्याध्यक्ष कीर्ती गांधी, सचिव किशोर दर्डा, सुनित कोठारी, पूर्वा कोठारी, लव दर्डा, राज्याच्या माहिती तंत्रज्ञान विभागाचे प्रधान सचिव पराग जैन, प्रवीण चंद्रकोटक (अहमदाबाद), आंतरराष्ट्रीय ख्यातीचे सीए जयेंद्रभाई शहा, जीजेईपीसीचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि मुंबई भाजपचे कोषाध्यक्ष किरीटभाई भन्साळी, युनिकेम लॅबोरिटरीज लि.चे चेअरमन प्रकाश मोदी, प्रसिद्ध उद्योगपती संजयभाई ठक्कर, अमेरिकेहून आलेले मनमोहन पटेल (कॅलिफोर्निया), एलोरा येथील बापूंच्या कथेचे यजमान राहिलेले राजेशभाई दोशी (मुंबई), रेमंडचे समूह सीएफओ अमित अग्रवाल, विकास शहा (अहमदाबाद) आदींची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी आंतरराष्ट्रीय ख्यातीचे जैन आचार्य पूज्य डॉ. लोकेश मुनीजी म्हणाले, मोरारी बापू यांच्या रामकथेच्या माध्यमातून कोटी कोटी नागरिकांमध्ये नैतिकता, चारित्र्य आणि मूल्यांची प्रतिष्ठापणा केली जाते. यावेळी त्यांनी ज्येष्ठ स्वातंत्र्य संग्राम सेनानी जवाहरलाल दर्डा यांच्या कार्याविषयी सांगितले. दिल्ली येथे १७ ते २५ जानेवारी या कालावधीत नऊ दिवसांची रामकथा आयोजित केली असल्याचे त्यांनी सांगितले. रामकथा पर्वाचे यजमान डॉ. विजय दर्डा यांनी परमपूज्य मोरारी बापू यांचे स्वागत केले. मी स्वत:ला भाग्यवान समजतो, मोरारी बापू यांचे यवतमाळच्या मातीला पाय लागले. रामकथा यवतमाळात व्हावी, अशी माझी आई वीणादेवी आणि पत्नी ज्योत्स्ना यांची इच्छा होती. त्यामुळे या आयोजनासाठी मी व्याकूळ होतो, असे डॉ. दर्डा म्हणाले. रामराज्यासाठी पाच पिढ्या घालाव्या लागतात पहिल्या दिवशी आध्यात्मिक संत आणि प्रख्यात कथाकार मोरारी बापू यांनी मातृ-पितृपक्षावर रामकथा पर्वाला प्रारंभ केला. जो आई-वडिलांच्या वचनांची पूर्तता करतो तोच खरा पुत्र, असे ते म्हणाले. भारतीय परंपरेतील चार मतांना सोबत घेतले तर रामराज्य निश्चित येते. पण रामराज्य आणणे सोपे नाही. त्यासाठी पाच पिढ्या घालाव्या लागतात. साधूमत आणि वेदमताच्या मध्ये लोकमत आणि राजनिती राहिली तर रामराज्याची संकल्पना प्रत्ययास येते, असे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी हनुमानगाथाही सांगितली. हनुमान चालिसा पठनामुळे श्रद्धा आणि बुद्धीही वाढेल, असे ते म्हणाले.

# गर्भवती माकडीन मृत्यू प्रकरण : पारदर्शक चौकशीची प्रा.पाठे यांची मागणी

यवतमाळ लोकनायक वृत्तसेवा - मार्च-एप्रिल महिन्यातील तीव्र उन्हाळ्यात एका गर्भवती माकडीनचा मृत्यू झाला.वेळेवर उपचार न मिळाल्यामुळे आणि वर्धा येथे रेफर न केल्यामुळे हा जीव वाचू शकला नाही.या घटनेसाठी त्या काळचे रेंज फॉरेस्ट ऑफिसर अमर सिडाम व त्यांचे कर्मचारी जबाबदार असल्याचे स्पष्ट होते. निवेदनं दिली पण कारवाई शून्य या प्रकरणासंदर्भात जिल्हाधिकारी,मुख्य वनसंरक्षक,तसेच प्रधान सचिव नागपूर यांच्याकडे वारंवार निवेदन देण्यात आले.मात्र,आजपर्यंत कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. एसीएफ निलेश सोनवणे यांचे आश्वासन हवेतच त्या वेळी एसीएफ निलेश सोनवणे यांनी स्वतः पारदर्शक चौकशी



होईल,दोषींवर कारवाई होईल असे आश्वासन दिले होते.पण महिना-दीड महिना नव्हे तर पाच-सहा महिने उलटून गेले तरी काहीच कारवाई झाली नाही.परिणामी या प्रकरणाकडे आम्हीदेखील दुर्लक्ष करू लागलो.पैशांच्या चर्चेमुळे निर्माण झाले प्रश्नचिन्ह दरम्यान,मार्केटमध्ये अशी चर्चा सुरू झाली की ङ्गपंढरी पाठे यांनी प्रकरण सेटल केलं असेल,कॉम्प्रमाईज झालं असेल किंवा पैसे घेतले असतील.ङ्गपरंतु मी हे स्पष्ट सांगू इच्छितो की अशा प्रकारचे धंदे मी मुळीच करत नाही,आणि कधीही करणारही नाही.चुका झाल्या असतील तर त्या मान्य आहेत,पण पैशांच्या बदल्यात तडजोड करणे हे माझ्या स्वभावातच नाही.ते माझ्या लँग्वेज ला,पर्सनॅलिटीला मुळात शोभत नाही. चौकशीवर टोलवाटोलवी-
या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश आता नव्याने रुजू झालेल्या रेंज फॉरेस्ट ऑफिसर प्रणाली धमाळे यांच्याकडे देण्यात आले आहेत.पण त्यांना या घटनेबाबत काहीच माहिती नाही.अशा परिस्थितीत चौकशी कितपत प्रभावी होईल,याबाबत शंका आहे. मुळात सोनवणे यांनीच सुरुवातीला 'मी चौकशी करतो आणि दोषींवर कारवाई करतो' असे सांगितले होते.तरी आता त्यांनी जबाबदारी झटकून ती नव्या अधिकाऱ्यांकडे दिली आहे.यावरून सोनवणे आणि अमर सिडाम यांच्यात काही संबंध असावेत का,असा संशय निर्माण होतो. पुन्हा मागणी...चौकशी सोनवणे यांच्याकडेच द्यावी आज दिनांक ६ सप्टेंबर,(शनिवार) रोजी मी स्वतः जाऊन रेंज फॉरेस्ट ऑफिसर प्रणाली धमाळे यांच्या कार्यालयात बयान दिले आहे.त्या वेळीही माझी स्पष्ट मागणी अशीच होती की ही चौकशी एसीएफ निलेश सोनवणे यांच्या हातूनच व्हावी.कारण सोनवणे हे पारदर्शक,अभ्यासू आणि अनुभवी अधिकारी आहेत.त्यांचा ग्राउंड टच उत्तम आहे.म्हणूनच चौकशी प्रभावी होऊन दोषींवर योग्य ती कारवाई होण्यासाठी ही जबाबदारी त्यांच्याकडेच असावी,हीच माझी ठाम मागणी आहे.

# पर्यावरण पूरक गणपती विसर्जनाला गणेश भक्तांचा प्रतिसाद

यवतमाळ लोकनायक वृत्तसेवा : प्लास्टर ऑफ पॅरिसची मूर्ती पाण्यात विरघळत नसल्यामुळे गणपती विसर्जना नंतर अनेक ठिकाणी मूर्ती भग्न अवस्थेत आढळून येतात त्यामुळे मूर्तीची विटंबना होऊ नये तसेच नदी, नाले, तलाव, विहीरी हे नैसर्गिक पाण्याचे स्त्रोत प्रदूषित होऊ नये, निसर्गाचे रक्षण व्हावे म्हणून प्लास्टर ऑफ पॅरिस मूर्ती गणेश भक्तांना दान मागण्यात आल्या.नगर परिषद यवतमाळ व सेवाभावी संस्थेच्या विनंतीला साथ देत या पर्यावरण पूरक विसर्जनाला यवतमाळकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून प्लास्टर ऑफ पॅरिसचे गणपती विसर्जन करण्यासाठी येणाऱ्या भाविकांनी दान दिले. यवतमाळ शहरात हा प्रयोग पहिल्यांदा करण्यात आला. यात प्लास्टर ऑफ पॅरिसच्या ३२५ मूर्ती भाविकांनी दान दिल्या असून मूर्ती दान देणाऱ्या गणेश भक्तांना सुंदर रोपटे देऊन या उपक्रमास प्रतिसाद दिल्याबद्दल त्यांचे स्वागत करण्यात आले.या मूर्तीचे व्यवस्थित संकलन करण्यात आले.यातून पुढील वर्षी दिव्यांगांना रोजगार मिळणार आहे.नगर परिषद कडून मूर्ती विसर्जनकरिता ४० केंद्रे उपलब्ध होती त्यापैकी साई मंदिर, प्रयासवन, रंगोली ग्राउंड, शिवाजी ग्राउंड, दत्तात्रय नगर लोहारा, विठ्ठलवाडी, अशा सहा केंद्रावर मूर्तीदान स्वीकारण्यात आले. माझी वसुंधरा अभियानांतर्गत या उपक्रमासाठी नगर परिषद यवतमाळ, युवा जागर ट्रस्ट आणि सवित्री जोतिराव समाजकार्य महाविद्यालय , धैर्य सोशल वेलफेअर फॉउंडेशन, प्रयास, यवतमाळ , निस्वार्थ सेवा फाउंडेशन,ओलावा फाउंडेशन,पगमार्क फाउंडेशन, युनिटी फाउंडेशन, आत्मभान फाऊंडेशन, पोलिस मित्र संघटना, वसुंधरा फाउंडेशन,पोलीस बॉईज फाउंडेशन या संस्थांनी पुढाकार घेतला होता. भाई अमन सोशल वेलफेअर फाउंडेशन द्वारे कृत्रिम टाक्यावरील स्वयंसेवका साठी सामाजिक बांधिलकी दाखवत जेवणाची व्यवस्था करण्यात आली.
उपक्रमाचे समन्वयन प्रा. घनश्याम दरणे, किशोर बाभुळकर, राहुल दाभाडकर,कमलेश बघेल यांनी केले. नगर परिषद, यवतमाळ मुख्याधिकारी शुभम क्यातमवार , नोडल अधिकारी नागेश कपाटे, स्वच्छता समन्वयक सागर भुते आणि इतर कर्मचाऱ्यांनी उपक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

## पान १ वरून

**लक्ष्मण हाके पुन्हा...**
येणाऱ्या निवडणूकीत ओबीसी समाज बांधव आ.पडितांना नक्कीच धडा शिकवतील असेही प्रा.लक्ष्मण हाके यांनी यावेळी बोलतांना सांगितले.

**संदल आणि मॅरेथॉनमध्ये...**
अधीक्षकांनी दोन धर्मियांच्या सणांमध्ये भेदभाव करणे हे देखील तितकेच चुकीचे म्हणावे लागेल. काही दिवसांपूर्वी बीडमध्ये मुस्लिम बांधवांच्या वतीने संदल चे आयोजन करण्यात आले होते. या संदल मध्ये मोठ्या आवाजात डीजे वाजवण्यात आला. विशेष म्हणजे हा डीजे वाजवताना पोलीस अधीक्षकांनी कोणत्याही नियमांचे पालन केलेले नाही. मग केवळ हिंदू धर्मियांच्या अस्मितेचा विषय असलेल्या गणेश विसर्जनाच्या मिरवणुकीतच पोलीस अधीक्षकांनी डीजेवर बंदी का घातली ? असा संतप्त सवाल गुरखुदे यांनी उपस्थित केला आहे. जर कायदा आणि सुव्यवस्था सर्वांसाठी एकसारखी नसेल तर मग दाद मागायची कुणाकडे ?. येणाऱ्या काळात एकतर सरसकट सगळ्यांना डिजे ची परवानगी देण्यात यावी अन्यथा कोणालाच डीजे वाजवू देऊ नका. अशी मागणी देखील परशुराम गुरखुदे यांनी केली आहे.

**स्वराज्य जनजागृती...**
आला असून या मेळाव्याला सर्व सक्रिय कार्यकर्त्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. मेळाव्याला सुरुवात सकाळी अकरा वाजता होईल.मेळाव्याला परिषदेचे उपाध्यक्ष संदीप जगताप सातारा, यांच्यासह कोषाध्यक्ष शिवाजी खेडकर पुणे, विश्वस्त विष्णू ढवळे छत्रपती संभाजीनगर, विश्वस्त अरुण बोबडे धाराशिव, यांच्यासह तुषार पाटील कुर्ला आणि गोवर्धन मस्के बीड यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.शासन आणि प्रशासन भरकटत चालले आहे. सामान्य जनतेची कामे नियमाप्रमाणे वेळेत होत नाहीत. त्यामुळे अशा प्रसंगी प्रश्न विचारणारी जनता तयार करण्यासाठी परिषद काम करणार आहे. लोकशिक्षण आणि लोकजागृती शिवाय आता पर्याय नसल्याने लोकांना आपले प्रश्न घेऊन स्वतः उभे राहता यावे, यासाठी हा लढा असेल.आमच्याशी संपर्कात असलेल्या सर्व जुन्या कार्यकर्त्यांसह नवीन कार्यकर्त्यांनी देखील यात सहभाग नोंदवायचा आहे. त्यामुळे जास्तीत जास्त कार्यकर्त्यांनी प्रामाणिकपणे काम करण्याच्या उद्देशाने या मेळाव्याला उपस्थित राहावे. या मेळाव्यात पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्यांसह मराठवाड्यात जिल्हा निहाय दौऱ्याबाबतचे नियोजन देखील करण्यात येणार आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन ॲड. देशमुख यांनी केले आहे.

**डिजीटल मीडिया पत्रकार...**
अधिवेशनाच्या या तयारीचा आढावा घेण्यासाठी शुक्रवारी अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त तथा महाराष्ट्रातील तमाम पत्रकारांचे आधारस्तंभ श्री.एस.एम.देशमुख हे छत्रपती संभाजीनगरात शुक्रवारी आले होते.एस.एम.देशमुख यांच्यासोबत परिषदेचे विश्वस्त शरद पाबळे, सरचिटणीस प्रा.सुरेश नाईकवाडे, डिजिटल मीडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे, प्रदेश उपाध्यक्ष गणेश मोकाशी, प्रदेश सदस्य जितेंद्र शिरसाठ, डिजिटल मीडियाचे बीड जिल्हा उपाध्यक्ष विश्वंभर मुळे या मान्यवरांची उपस्थिती होती. प्रारंभी एस.एम.देशमुख यांचे स्वागत परिषदेचे जिल्हाध्यक्ष बालाजी सूर्यवंशी यांनी पुष्पगुच्छ देऊन केले. तसेच जिल्हा सरचिटणीस प्रकाश भगनुरे, कार्याध्यक्ष कानिफ अन्नपूर्णे, कोषाध्यक्ष महादेव जामनिक यांनी परिषदेचे विश्वस्त शरद पाबळे, सरचिटणीस प्रा.सुरेश नाईकवाडे, डिजिटल मीडियाचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे, प्रदेश उपाध्यक्ष गणेश मोकाशी, प्रदेश सदस्य जितेंद्र शिरसाट, विश्वंभर मुळे या मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. याप्रसंगी एस.एम.देशमुख यांनी संत एकनाथ नाट्यमंदिर व परिसराची पाहणी करून अधिवेशन यशस्वीपणे पार पाडण्यासाठी मार्गदर्शन केले.

## पान ४ वरून

**हैदराबाद गॅझेट...**
समाज बांधवांनी एकत्र यावे असे आवाहन अर्जुन नायक (राठोड) यांनी केले. आज इतिहास आपल्याला एक सुवर्णसंधी देत आहे. बंजारा समाजाचे हक्काचे स्थान पुन्हा मिळवण्यासाठी, पुढील पिढ्यांना न्याय देण्यासाठी आणि समाजाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी प्रत्येक समाजबांधवाने या आंदोलनात सहभागी व्हावे. आपल्या न्याय्य हक्कासाठी, भावी पिढ्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी आणि समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी पुन्हा एकदा पांढरे वादळ हे महाराष्ट्रात घोंगावणार असुन बंजारा समाजाने आंदोलन उभे करण्यात येणार आहे. वेगवेगळ्या संघटना, वेगवेगळे विचार असले तरी एकत्र येण्याची वेळ आली आहे. आपल्या एकतेच्या बळावर आपण हा न्याय मिळवू आणि बंजारा समाजाला पुन्हा त्याचे खरे स्थान मिळवून देऊ शकतो असेही अर्जुन नायक यांनी महटले आहे.

**कृत्रिम तलावा...**
फिरवून श्री गणरायाच्या मूर्तीचे व निर्माल्यांचे संकलन करण्यात आले यासाठी नगरपंचायतीचे सर्व कर्मचाऱ्यांनी पुढाकार घेतला होता

**डोंगरकिन्ही जि...**
परिसरातील शेतकऱ्यांना आ सुरेश धस यांच्या मार्गदर्शनाखाली वेळोवेळी मदतीसाठी तत्पर असणारे संभाजीराजे सेवाभावी वृत्तीचे असल्याने ,तसेच आ सुरेश धस यांचे कट्टर समर्थक किसान आघाडीचे माजी ता अ माजी उपसरपंच तथा प्रमाणिक समाजसेवक स्व दिनकरराव येवले यांचे संभाजीराजे हे चिरंजिव आहेत,आ सुरेश धस, जयदत्त धस,सागर धस यांचे विश्वास पात्र कार्यकर्ते आहेत.संभाजी येवले यांचे बीड जिल्हा परिषदेच्या प्रत्येक विभागातील अधिकारी कर्मचारी यांच्याशी प्रेमाचे संबंध आहेत तर ग्रामविकासाच्या विविध योजनांची अभ्यासपूर्ण माहिती असणारे गण प्रमुख संभाजीराजे येवले हे जि प च्या उमेदवारीसाठी प्रबळ दावेदार असल्याचे बोलले जात आहे.

**आज श्रींचा...**
उत्सवाच्या पाच दिवसांत विविध धार्मिक कार्यक्रम आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. भाविकांनी मोठ्या श्रद्धेने टेंबे गणपती चरणी पावणेदोन किलो चांदीचे दागिने, तसेच सोन्या-चांदीच्या दुर्वा व मोदक अर्पण केले. यावर्षी शतकोत्तर वर्ष असल्याने टेंबे गणपती मंदिराच्या नूतन बांधकामाचे नियोजन करण्यात आले असून भाविकांनी मंदिर निर्मितीसाठी उत्स्फूर्तपणे देणग्या अर्पण करून सहभाग नोंदवला आहे.

**आष्टी नगरपंचायतच्या...**
निर्मिती केली होती. व निर्माल्यासाठी वेगळी व्यवस्था केली होती. यामुळे शहरातील लोकांनी आपापल्या गणरायांच्या मुर्तीचे कृत्रीम तालावात विसर्जन केली व निर्माल्य नदिमध्ये न फेकता नगरपंचायतच्या निर्माल्य गोळा करण्यासाठी केलेल्या जागेवर हे निर्माल्य दिले गेले यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास पण झाला नाही.आणि गणरायांच्या मुर्तीचे योग्य रित्या विसर्जन झाले.

**एमआयडीसी...**
रस्त्यावरच शासकीय आयटीआय महाविद्यालय तसेच एमआयडीसी परिसर आहे. दरवर्षी निवडणुकीदरम्यान याच शासकीय आयटीआयमध्ये मतमोजणी प्रक्रिया पार पडते. तरीसुद्धा या महत्त्वाच्या रस्त्याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याची खंत नागरिक व्यक्त करत आहेत.
पावसाळ्यात रस्त्याची अवस्था अधिकच बिकट झाली आहे. दुचाकीस्वारांना खड्डे चुकवताना तोल जाऊन अपघात होत आहेत, तर चारचाकी वाहनधारकांनाही मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. अनेकदा स्थानिकांनी प्रशासनाकडे तक्रारी नोंदवूनही अद्याप दुरुस्तीचे काम हाती घेतलेले नाही. 'खड्डेमय रस्त्यावरून प्रवास करताना जीव मुठीत धरावा लागतो. प्रशासनाने तातडीने लक्ष घालून रस्ता दुरुस्त न केल्यास आम्हाला आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल,' असा इशारा स्थानिक नागरिक व वाहनधारकांनी दिला आहे.

लोकनायक

सोमवार दि.८ सप्टेंबर २०२५

३

# मुक्या प्राण्यांना तात्काळ सेवा देऊन रोगमुक्त करणाऱ्या पशुवैद्यकीय अधिकारी वसुधा मुसळे

लोहा प्रतिनीधी – लोहा पशु वैद्यकिय अधिकारी वसुधा मुसळे मॅडम ह्या नेहमीच तत्पर सेवा बचावत मुक्या प्राण्यांना जिवदान देत आसतात मुख्या प्राण्याची सेवा हिच ईश्वर सेवा मानून सदैव आपल्या सेवेत असणाऱ्या पशुवैदकिय अधिकारी मुसळे मॅडम यांनी सायाळ गावामध्ये देवाला दान म्हणून काही वन गाई असून त्या गोमातेचे चार वळू जनावरे आहेत त्यांना मागील महिन्यामध्ये गंभीर लंपी आजार झाला होता. ती जनावरे दररोज सायाळ या गावातील प्रत्येक घरी जाऊन निवेद भाकरी खातात त्यामुळे इतर जनावरांचा संसर्गजन्य रोग त्या जनावरांना झाला त्यावेळी चार दिवस ते जनावरे गावांमध्ये निवेद खाण्यासाठी येत नव्हती. त्यांना अतिशय ताप आला होता त्यावेळी सायाळ येथील शेतकरी रत्नाकर ढगे यांनी पशुवैद्यकीय अधिकारी वसुधा मुसळे मॅडम यांना फोन करून सांगितले त्यावेळी त्यांनी प्रत्येक्ष येऊन तीन दिवस शासकिय औषध देऊन जनावरांना उपचार केले व ती जनावरे आजारामधून बरी झाली. दिनांक ६ सप्टेंबर रोजी त्याच जनावरांपैकी एक गाय रात्रीपासून वासरू अडवलं होतं आणि सदरील गोमाता तगमग तगमग करत होती त्यावेळी सायाळ येथील शेतकरी रत्नाकर ढगे ,रामेश्वर पवार हे तालुक्याला कामानिमित्त जात होते. त्यावेळी त्यांच्या निदर्शनास आले की गाय तगमग तगमग करत आहे आणि त्यांनी आपली गाडी बाजूला लावून उतरले तर वासराचे पाठीमागले दोन पाय




बाहेर आले होते पण कितीही ताकद लावली तरीही वासरू बाहेर येत नव्हतं आणि गोमातेचा श्वावो श्वास बंद होत होता. त्यावेळी लोहा तालुका पशुवैद्यकीय अधिकारी मुसळे मॅडम यांना सायाळ येथील शेतकरी बांधवांनी दूरध्वनीवरून संपर्क साधला त्यावेळी पशुवैद्यकीय अधिकारी मुसळे मॅडम यांनी सहा किलोमीटर अंतर अवघ्या दहा मिनिटांमध्ये पार करून गोमातेच्या पोटामध्ये मृत झालेले वासरू बाहेर काढले आणि त्या गोमातेला ट्रीटमेंट केली त्यावेळी गावकऱ्यांनी त्यांचे आभार व्यक्त केले. शेतकरी बांधवांच्या पाळून जनावर उपचार करण्यासाठी ऐका फोनवर उपलब्ध होतात व पशुधनावर वेळीच उपचार करून रोगमुक्त करतात अशा या कार्यतत्पर कृतव्यदक्ष पशुवैद्यकीय अधिकारी मुसळे मॅडम यांचे सायाळ गावातील शेतकऱ्यांच्या वतीने त्यांचे आभार मानून सर्वांनी कौतुक केले आणि अशाच अधिकाऱ्यांची गरज असल्याचे मत व्यक्त केले त्यावेळी जिल्हा परिषद शाळा सायाळ येथे पशुवैद्यकीय अधिकारी मुसळे मॅडम यांचा सत्कार करण्यात आला. पाच सप्टेंबर रोजी शिक्षक दिन होता आणि शाळेला सुट्टी असल्याकारणाने आज ६ सप्टेंबर रोजी जिल्हा परिषद शाळेतील सर्व शिक्षकांचा सत्कार शेतकऱ्यांच्या वतीने करण्यात आला त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पशुवैद्यकीय अधिकारी मुसळे मॅडम उपस्थित होत्या. त्यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शनातून सांगितले की आपण जे काम करतो त्यामध्येच देव आहे काम कोणतेही असो म्हणून मीही जिल्हा परिषद शाळेतीलच विद्यार्थी आहे आणि पंचवीस वर्षानंतर मला जिल्हा परिषद शाळेमध्ये येण्याचा योग आला शिक्षकांचा सत्कार करण्याचे भाग्य लाभलं मी भाग्यवान असल्याचे मत व्यक्त केले जिल्हा परिषद शाळेचे आदर्श पुरस्कार प्राप्त शिक्षक काशिनाथ शिरशीकर यांनी आपल्या मनोगत गतातून सांगितले की येत्या दहा ते पंधरा वर्षांमध्ये सायाळ या गावचे विद्यार्थी अनेक चांगल्या नोकरीला दिसतील आम्ही सर्व शिक्षक तसे प्रयत्न सतत करत आहोत आणि गावकऱ्यांचंही आम्हाला योगदान मिळत आहे विद्यार्थीही प्रतिसाद देत आहेत असे मत व्यक्त केले त्यावेळी उपस्थित पशुवैद्यकीय अधिकारी व सुधा मुसळे मॅडम आदर्श शिक्षक काशिनाथ शिरशीकर. मुल्ला सर. ज्येष्ठ शिक्षिका बोराडे मॅडम. माने मॅडम. चित्रावार मॅडम .गोमारे मॅडम. कळम मॅडम. पुरी सर. सिकंदर शेख व गावातील शेतकरी माधव ढगे. रामेश्वर पवार. प्रल्हाद पवार. रत्नाकर ढगे. शिवचरण ढगे व सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

## एक गाव एक गणपती टाळ मृदंगाच्या गजरात बाप्पाचा निरोप

देगलूर मनोज बिरादार – लिंगनकेरुर ता. देगलूर. नांदेड येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी एक गाव एक गणपती या नियमाचे पालन करून सर्व गावकऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली गावामध्ये गणरायाची स्थापना करण्यात आली दहा दिवस गावातील सर्व लहान थोर यांनी मनोभावे गणरायाची सेवा केली व अकराव्या दिवशी डीजे ढोल ताशा याचा वापर न करता टाळ मृदुंगाच्या गजरात गणरायाला निरोप देण्यात आला. यावेळी गावातील ज्येष्ठ नागरिक लहान थोर युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. गणपती बाप्पा मोरया पुढल्या वर्षी लवकर या.



## जामखेड येथे १५ वर्षीय तरूणीची गळफास घेऊन आत्महत्या




जामखेड तालुका प्रतिनिधी अजय अवसरे – जामखेड वार्ताहर:जामखेड शहरात सगळीकडे गणेश विसर्जनाची धामधूम सुरू असताना शहरातील शिवाजीनगर भागातील एका पंधरा वर्षीय तरूणीने राहत्या घरात ओढणीच्या साहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. यामुळे शहरासह परिसरात एकच खळबळ उडाली आहे. आत्महत्येचे कारण समजू शकले नाही जामखेड पोलीस पुढील तपास करत आहेत.याबाबत मयत मुलीचे चुलते मोहन विनायक गायकवाड वय ३६ वर्षे धंदा हॉटेल व्यवसाय रा. मोहा ता. जामखेड जि. अहिल्यानगर यांनी असे सांगितले की, समक्ष जामखेड पोलीस स्टेशन येथे हजर होवुन फिर्याद लिहुन देतो की मी वरील ठिकानचा राहणार असुन घरात मी आई सुदंरबाई, वडील विनायक, भाउ सोमनाथ, असे आम्ही एकत्रीत राहणेस असुन मी तुळजाभवानी नावाचे हॉटेल चालवुन कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो.माझा मोठा भाऊ गणेश विनायक गायकवाड हा त्याचे कुटुंबासह शिवाजीनगर जामखेड ता.जामखेड येथे राहणेस आहे.दि.०५.०९.२०२५ रोजी सायंकाळी ०६.०० वा चे सुमारास मी मोहा ता जामखेड येथे घरी असताना मला आमचे नातेवाईक तुकाराम भोरे यांनी फोन करुन सांगितले की तुझी पुतणी भक्ती गणेश गायकवाड वय १५ वर्षे रा. शिवाजीनगर जामखेड ता. जामखेड जि. अहिल्यानगर हीने राहते घरी ओढणीचे सहाय्याने गळफास घेतला असुन आम्ही तीला खाली उतरुन घेतले आहे.तीला उपचारकरीता ग्रामीण रुग्णालय जामखेड ता. जामखेड येथे घेवुन जात आहोत तरीतु ताबडतोब ये असा फोन आल्याने मी ताबडतोब ग्रामीण रुग्णालय जामखेड ता. जामखेड येथे आलो त्यावेळी तेथील डॉक्टर यांनी पुतणी भक्ती गणेश गायकवाड वय- १५ वर्षे रा.शिवाजीनगर जामखेड ता. जामखेड जि. अहिल्यानगर हीस तपासुन ती मयत असल्याचे सांगितले. अशा प्रकारे फिर्याद दाखल करण्यात आली आहे. आत्महत्येचे कारण समजू शकले नाही. वरील घटनेचा तपास जामखेड पोलीस करत आहेत.आत्महत्येमुळे शहरासह परिसरात एकच खळबळ उडाली आहे. आईचे ब्युटी पार्लर चे बाजार तळ येथे दुकान होते अशी माहिती कळली आहे.

## नगरसेवक अमित भाऊ चिंतामणी यांच्या वतीने सर्व गणेश भक्तांचे उत्साहात स्वागत

अजय अवसरे – जामखेड शहरातील नगरसेवक अमित भाऊ चिंतामणी ज्वेलर्स मेनपेट येथे सर्व गणेश मंडळाचे सत्कार आयोजित करण्यात आले होते. या मंचावर मंडळाचे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांना फेटा बांधून,शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सन्मान करून सत्कार करण्यात आला. सामाजिक कार्यात नेहमीच अग्रेसर असणारे नगरसेवक अमिंत भाऊ चिंतामणी यांनी मोठी भर घातली आहे.समाज कार्य व गणेश उत्सव मध्ये नेहमी सहभाग घेऊन जामखेड मधील युवा वर्गात असलेली पसंती ही कौतुकास्पद आहे.शहरातील प्रत्येक सामाजिक कार्यात हिरिरीने सहभाग नोंदवत आपला एक आदर्श निर्माण केला आहे. यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, याही वर्षी सर्व मित्र परिवाराच्या माध्यमातून गणेश विसर्जन सोहळा च्या सर्व गणेश मंडळाचे स्वागत करून या ठिकाणी शाल श्रीफळ व सन्मान देऊन स्वागत करणार आहोत तो आपण स्विकरावा अशी सर्व गणेश मंडळांना विनंती आहे. यावेळी उपस्थित मा.सभापती डॉ.भगवान मुरुमकर ,जामखेड नगरपरिषदेचे नगरसेवक डॉ.झेंडे, मनोज काका कुलकर्णी, नगरसेवक गणेश आजबे, प्रथम उपनगराध्यक्ष फिरोजभाई कुरेशी, जिल्हा आघाडीचे अध्यक्ष राऊत सर, ओबीसीचे तालुकाध्यक्ष विष्णू गंभीरे, अण्णासाहेब गंभीरे, प्रवीण बोलभट, अण्णा ढवळे, केदार रसाळ, राहुल चिंतामणी व पत्रकार बंधु तसेच गणेश मंडळांतील युवा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वडवणी प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ.शुभम यादव यांची आत्महत्या

वडवणी लोकनायक वृत्तसेवा:– वडवणी येथील,प्राथमिक आरोग्य केंद्र तथा आयुष्यमान आरोग्य मंदिरातील वैद्यकीय अधिकारी डॉ.शुभम बालकनाथ यादव अंदाजे वय २९ वर्ष रा.देवळा ता.अंबाजोगाई हल्ली मुक्काम बीड या ठिकाणी होता दि.६ सप्टेंबर शनिवार रोजी चिखलबीड ग्रामपंचायत अंतर्गत असणाऱ्या देठेवाडी येथील तलावात मृतदेह तरंगताना आढळून आल्यामुळे मोठी खळबळ उडाली होती पोलीस घटनास्थळी दाखल होऊन मृतदेह तलावाच्या बाहेर काढल्या असता ओळख पटली असून काही दिवसांपासून तणावाखाली असल्यामुळे डॉ.



शुभम यादव यांनी आत्महत्या केली असावी असे बोले जात आहे. नुकतच काही दिवसापूर्वी वडवणी न्यायालयातील सरकारी वकील अभियोग्यता ॲड.व्ही.एल.चंदेल यांनी न्यायालयातच सत्काराच्या शालिनी गळफास घेऊन आत्महत्या केल्यामुळे महाराष्ट्रात खळबळ उडाली होती हे प्रकरण ताजे असतानाच वडवणी येथील आयुष्यमान आरोग्य मंदिरातील वैद्यकीय अधिकारी डॉक्टर शुभम बालकनाथ यादव यांनी आत्महत्या केल्यामुळे खळबळ उडाली आहे त्यांच्या आत्महत्येचे कारण आणखीन स्पष्ट झाले नाही पुढील तपास पोलीस करत आहेत. डॉ.शुभम यादव यांची कर्तव्यदक्ष वैद्यकीय अधिकारी म्हणून ओळख होती चांगल्या पद्धतीने रुग्णसेवा करत होते दवाखान्यातील कर्मचारी व स्थानिक नागरिक,रुग्ण त्यांच्या मृत्यूमुळे हळहळ व्यक्त करत आहेत.

**टी. सी. हरवली आहे**

प्रदीप भगवान नागरगोजे
या नावाची, १२ वी पासचा टिसी बीड ते गुंधा वडगाव प्रवासात हरवली आहे सापडल्यास संपर्क ,मो,७३७८७८९७०६

**टी. सी. हरवली आहे**

घनसावंगी येथील सोनलाल भगवान तारगे यांची २०२४ ते २०२५ या वर्षाची ( बी.ए तृतीय) संत रामदास महाविद्यालय घनसावंगीची टीसी अंबड – घनसावंगी प्रवासात हरवली आहे ज्यांना कोणाला सापडली असेल त्यांनी खालील मोबाईल क्रमांकाची संपर्क साधावा. मो.– ८६९८५८७१०१

## विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार संघटनेने जपली सामाजिक बांधिलकी

### वर्धापन दिनानिमित्त भव्य रक्तदान शिबिर

विनोद गोडबोले नागपूर – विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियनच्या ४८ व्या वर्धापन दिन नुकताच पार पडला यावेळी सामाजिक बांधिलकी जपत भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते रक्तदान शिबिरात १७४ रक्तदात्यांनी रक्तदान केले. ४ सप्टेंबर गुरुवारला वीज केंद्राची प्रकाशनगर वसाहत मनोरंजन केंद्र–२ येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.उदघाटन मुख्य अभियंता गिरीश कुमरवार यांच्या हस्ते करण्यात आले कार्यक्रमांच्या अध्यक्षस्थानी झोन अध्यक्ष संजीवकुमार गर्जे होते याप्रसंगी प्राचार्य रामकृष्ण टाले, उपमुख्य अभियंता नितीन रोकडे, अधिक्षक अभियंता विलासकुमार उके, सहाय्यक महाव्यवस्थापक नितीन काळे, वैद्यकीय अधिक्षक डॉ मुकेश गजभिये, गजानन सुपे, बापू देशमुख, शैलेंद्र अर्जितवार विनोद हुड, प्रकाश परमार, अशोक भागवतकर, पुरुषोत्तम साबळे आदि प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.यावेळी मुख्य अभियंता गिरीश कुमरवार यांनी विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियन सामाजिक कार्यक्रम राबवून समाजाची सेवा करीत असल्याचे सांगून संघटनेच्या प्रगतीकरीता त्यांनी शुभेच्छा दिल्या. प्राचार्य रामकृष्ण टाले यांनी रक्तदान श्रेष्ठदान असल्याचे सांगितले आणि त्यामूळे त्यांनी आपल्या जीवनातील १११ वेळा रक्तदान केले असल्याचे आवर्जून सांगितले.वर्धापन दिनी कंठीराम शेंडे व प्रेमलाल लोधी यांचा सेवापूर्ती सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष संजीवकुमार गर्जे यांनी संघटनेच्या माध्यमातून दरवर्षी सामाजिक उपक्रम राबविले जात असल्याचे सांगितले वर्धापन दिनाचे औचित्य साधून वार्ताफलक अनावरण,



वृक्षारोपण करण्यात आले रक्त संकलन गव्हर्नमेंट मेडिकल कॉलेज नागपूर आणि जीवन ज्योती ब्लड बँक नागपूर यांनी केले कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंगेश डेहनकर संचालन नंदकिशोर पाहुणे तर आभार विलास हिंगे यांनी मानले रक्तदान शिबिराला मोठ्या संख्येने संघटनेचे सदस्य उपस्थित होते.

## सरपंच शत्रुघ्न कणसे यांनी शेत रस्तेसमृद्ध योजनेसाठी दैठना बु, येथील शेतरस्त्यावर जाऊन ,पाहणी केली

### शेत रस्तेसमृद्ध योजनेचा लाभ संपूर्ण परतूर तालुक्यातील शेतकऱ्यांनी घेवा- भाजपा,ता. अध्यक्ष – सरपंच शत्रुघ्न कणसे

लोकनायक वर्तसेवा–गणेश लालझरे – महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे साहेब यांची महत्त्वकांक्षी शेत रस्तेसमृद्ध योजना रस्ते नकाशावर घेऊन त्यांना अनुक्रमांक दिल्या जाणार व ग्रामीण मार्ग योजनेअंतर्गत रस्ते आता होणार मजबुत व पक्के होणार मा. महसूल मंत्री बावनकुळे साहेब यांच्या ऐतिहासिक निर्णयानुसार शेती मध्ये जाण्यासाठी गाडी रस्ता



यांना विशिष्ट क्रमांक देऊन त्याची नोंद गाव नकाशा मध्ये घेण्यासाठी गावकऱ्यांसमवेत आज सरपंच शत्रुघ्न सदाशिवराव कणसे यांच्या मार्गदर्शनाखाली दैठणा बुद्रुक गावामध्ये, मंडळ अधिकारी, तलाठी व ग्रामसेवक यांच्या उपस्थितीमध्ये ग्रामसभा घेण्यात आली व रस्ते गुगल मॅप संदर्भात मार्गदर्शन व प्रत्यक्ष शेत रस्त्यावर जाऊन पाहणी करण्यात आली यावेळी उपसरपंच रामराव चव्हाण, चेअरमन वसंतराव बेरगुडे तलाठी ग्रामसेवक ग्रामपंचायत सदस्य व गावकरी मंडळी उपस्थित होते.

## युथ युनिटी सार्वजनिक गणेश उत्सव मंडळाच्या आरोग्य शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

विनोद गोडबोले नागपूर:– चणकापूर वॉर्ड क्रमांक २, नगर ओम नगर, हनुमान टेकडी येथे युथ युनिटी सार्वजनिक गणेश उत्सव मंडळ यांच्या वतीने मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला स्थानिक नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शेकडो नागरिकांनी मोफत आरोग्य तपासणी करून घेतली व औषध वितरणाचा लाभ घेतला. शिबिराच्या उद्घाटनावेळी उपस्थित डॉक्टरांच्या हस्ते वृक्षारोपण कार्यक्रम पार पडला. शिबिरादरम्यान तज्ञ डॉक्टरांनी




नागरिकांची तपासणी करून आवश्यक मार्गदर्शन केले. सर्व उपस्थितांना मोफत औषधे देखील पुरविण्यात आली. या आरोग्य शिबिरात डॉ. मोनाली कावडे (स्त्री व त्वचा रोग विशेषज्ञ), डॉ. मनोज पांडे (जनरल फिजिशियन) आणि डॉ. अंकिता पांडे (नेत्ररोग तज्ज्ञ) यांनी तपासणी करून रुग्णांना सल्ला दिला. समाजासाठी आरोग्यदायी संदेश देणारे असे उपक्रम प्रत्येक मंडळाने करावेत, असे या शिबिरातून अधोरेखित झाले.


**सुचना**
दैनिक **लोकनायक** वृत्त पत्रातुन प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी यासंबधी व्यवहार करावा. जाहीरातीत आपल्या उत्पादन व सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात. त्यांची लोकनायक वृत्तपत्र समुह कोणतीही हामी घेत नसुन केलेल्या दाव्याची पुर्तता. जाहिरातदराकडुन न झाल्यास त्यांच्या परिणामाबद्दल लोकनायक वृत्तपत्र समुह जवाबदार राहणार नाही. याची कृपया सन्माननिय वाचकांनी नोंद घ्यावी.

बीडचा
महाराष्ट्राचा महानायक
**लोकनायक**
४
सोमवार दि.८ सप्टेंबर २०२५

# हैदराबाद गॅझेट चा लाभ संपूर्ण महाराष्ट्रात लागू करण्याची मागणी

## जर मराठवाडा विभागातील बंजारा समाजाला हैदराबाद गॅझेटमुळे एसटीचा लाभ मिळत असेल, तर उर्वरित महाराष्ट्रातील बंजारा समाजालाही तोच लाभ मिळायला हावा

**लोकनायक वर्तसेवा-गणेश लालझरे-** हैदराबाद संस्थानच्या गॅझेटमध्ये बंजारा समाजाचा एसटी प्रवर्गात समावेश असल्याचे ठोस पुरावे उपलब्ध आहेत. ज्या पद्धतीने या गॅझेटमधील नोंदींवरून महाराष्ट्रात मराठा समाजाचा कुनबी म्हणून उल्लेख पुरावा मानला जात आहे, त्याच तत्त्वावर बंजारा समाज शासनाने मराठा समाजाला हैदराबाद गॅझेट च्या नोंदी नुसार जो कायदेशीर जीआर काढण्यात आला या हैदराबाद गॅझेट च्या नोंदी नुसार मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र या जीआर नुसार देण्यात येणार आहे. त्याप्रमाणे बंजारा समाजाच्या सुधा हैदराबाद गॅझेट मध्ये नोंदी आहेत आंध्रा प्रदेश मध्ये बंजारा समाज हा एसटी प्रवर्गामध्ये आहे तेलंगणा या राज्यात बंजारा समाज एसटी प्रवर्गामध्ये आहे या हैदराबाद गॅझेट च्या नोंदी नुसार बंजारा समाज हा सुद्धा एसटी प्रवर्गामध्ये समाविष्ट करता येतो म्हणून ज्याप्रमाणे मराठा समाज यांच्यासाठी जीआर काढण्यात आले त्याप्रमाणे बंजारा समाजाचे सुद्धा डढ प्रवर्गामध्ये आहे असे जीआर काढून महाराष्ट्रामध्ये सुद्धा बंजारा समाज एसटी प्रवर्गात समाविष्ट करून घेण्यात यावे असे अर्जुन नायक (राठोड) यांनी बोलतांना सांगितले. अन्यथा समाजाला आंदोलनासाठी प्रवृत्त करू नये असा इशारा त्यांनी दिला आहे. तसेच समाज बांधवांनी नव्या जोमाने नव्या ताकदीने एकजूट




दाखवून देण्याची हीच ती वेळ असल्याचेही त्यांनी महटले आहे. याबाबत पुढे बोलतांना त्यांनी सांगितले की, आज तेलंगणा (एस टी), आंध्रप्रदेश (एस टी), कर्नाटक (एस.सी.) अशा लगतच्या राज्यांमध्ये बंजारा समाज आदिवासी प्रवर्गात समाविष्ट आहे. या सर्व राज्यांतील बंजारा समाजाशी रोटी-बेटी व्यवहार महाराष्ट्रातील बंजारा समाजाचा आजही अखंड सुरू आहे. सगेसोयरे, विवाह-संबंध आणि सांस्कृतिक नाते एकसंध असल्यामुळे एका राज्यात एसटी तर दुस□या राज्यात नाही, हा भेदभाव न्याय्य ठरू शकत नाही. यासाठी बंजारा समाजाने आता आपली कंबर कसली पाहिजे. बंजारा



समाजाचा एसटी प्रवर्गात समावेश व्हावा, यासाठी कायदेशीर, ऐतिहासिक आणि सामाजिक पुरावे पुरेपूर मजबूत आहेत. आता या चळवळीला समाजबांधवांनी खांद्याला खांदा लावून साथ देणे ही काळाची गरज आहे. यासाठी आपणास ठाऊक आहे की, आपण सर्व समाजबांधव समाज म्हणून एकत्र येण्याची गरज सध्या आहे. वेगवेगळ्या संघटना, वेगवेगळे विचार परंतु आपल्या न्याय हक्कासाठी पुन्हा एकदा नव्या जोमाने नव्या ताकदीने एकजूट होण्याची गरज आहे. आपण एकत्र आलो तर निश्चितपणे आपल्याला न्याय मिळाल्याशिवाय राहणार नाही त्यासाठी सर्व **पान २ वर**

## कृत्रिम तलावा श्री गणेशाचे विसर्जन

**घनसावंगी लोकनायक वृत्तसेवा** - घनसावंगी नगरपंचायतीच्या वतीने कृतीम तलावात गणेश श्री गणेशाची विसर्जनासाठी पुढाकार घेण्यात आला होता यास नागरिकांनी मोठा प्रतिसाद दिला शहरातील नागरिकांनी नगरपंचायत कार्यालय परिसरात उभारण्यात आलेल्या कृत्रीम तलावात विसर्जन



करण्यात आले. त्याचबरोबर शहरातील अनेक भागात श्री गणेश मूर्ती संकलनासाठी वाहन फिरू

## डोंगरकिन्ही जि प गटात आ सुरेश धस यांचे कट्टर समर्थक संभाजीराजे येवले प्रबळ दावेदार - आप्पा मांडवे,बापुराव रायते

**पाटोदा/लोकनायक वृत्तसेवा** - पाटोदा तालुक्यात जि प व पंचायत समितीच्या निवडणुकीचे वारे वहायला लागले असुन तीनही जिल्हा परिषद गटात तुल्यबळ लढती होणार असल्याचे चित्र सध्या दिसत असल्याने डोंगरकिन्ही जि प गटात आ सुरेश धस यांचे कट्टर समर्थक संभाजीराजे येवले हे प्रबळ दावेदार असल्याचे या गटातुन उमेदवारी मिळावी अशी



मागणी आप्पा मांडवे तसेच बापुराव रायते यांच्या सह अनेक तरुणांनी केली आहे. संभाजीराजे येवले हे डोंगरकिन्ही भाजपा गण प्रमुख असुन पाटोदा तालुक्यातील एक सामाजिक चळवळीतील कार्यकर्ते आहेत.तसेच शैक्षणिक व आध्यात्मिक कार्यात त्यांची एक ओळख आहे.आ सुरेश धस परिवाराचे कट्टर समर्थक आहेत. आ सुरेश धस यांच्या मार्गदर्शनाखाली पाणी पुरवठा योजना कार्यान्वित केली,वस्ती रस्ते,पाणंद रस्ते,वयक्तीक लाभार्थ्यांची घरकुले, विहीर,गायगोठे,कृषीच्या योजना, घरापर्यंत दिल्या तर तात्या टोपन नावाने परिचित असलेले संभाजीराजे येवले हे अनेक निराधारांचे आधार झाले.वृध्दांची काठी होऊन आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या.तर **पान २ वर**



**लोकनायक वृत्तसेवा - आज छत्रपती संभाजीनगर येथील गॅलेक्सी हॉस्पिटल येथे संघर्ष योद्धा माननीय मनोज दादा जरांगे पाटील यांची शिवसेना माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी भेट घेऊन त्यांच्या तब्येतीची आस्थेवाईकपणे विचारपूस केली. व मराठा आरक्षणाच्या या लढ्यामध्ये महाराष्ट्रासह बीड जिल्ह्यातील जीव गमावलेल्या मराठा बांधवांच्या वारसांना मदत मिळवून दिली याबद्दल त्यांचे आभार मानले..**

## आज श्रींचा विसर्जन सोहळा

**माजलगाव लोकनायक वृत्तसेवा** - माजलगावकरांच्या श्रद्धेचे केंद्रस्थान असलेल्या श्री ढुंढिराज टेंबे गणेश मंडळाचा गणेशोत्सव यंदाही मोठ्या दिमाखात आणि भक्तिभावाच्या वातावरणात पार पडला. उत्सव काळात हजारो भाविकांनी श्रींच्या चरणी माथा टेकवत दर्शन घेतले, आशीर्वाद प्राप्त केले .विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. आज, सोमवार दि. ८ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता



महाआरतीनंतर विसर्जन मिरवणुकीला प्रारंभ होणार आहे. ही मिरवणूक टेंबे गणपती मंदिरापासून हनुमान चौक मार्गे

**श्री ढुंढिराज टेंबे गणेश मंडळाचे अध्यक्ष अनंतशास्त्री जोशी यांचे तर्फे सर्व भाविकांना, नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की, विसर्जन मिरवणुकीत मोठ्या संख्येने सहभागी होऊन उत्सवाचा आनंद घ्यावा आणि समाजातील ऐक्य व एकोप्याचा संदेश दृढ करावा.**

झेंडा चौकापर्यंत नेण्यात येणार आहे. नेहमीप्रमाणे टेंबेच्या उजेडात, भक्तिगीतांच्या स्वरात, ढोल-ताशांच्या गजरात आणि ङ्गगणपती बाप्पा मोरयाच्या घोषात हा सोहळा पार पडेल. मिरवणुकीत धार्मिक व ऐतिहासिक देखावे, सांस्कृतिक झांकी, पारंपरिक कलांचे दर्शन आणि सामाजिक संदेश सादर करण्यात येणार आहेत. विशेष आकर्षण म्हणून ऐतिहासिक शाहिस्तेखानाची फजिती हा देखावा तसेच जगन्नाथाचा रथ हा धार्मिक देखावा लक्षवेधी ठरणार आहे. **पान २ वर**

## आष्टी नगरपंचायतच्या चोख नियोजनामुळे गणरायांचे कृत्रीमतलावात विसर्जन

### निर्माल्याची सुद्धा योग्य रितीने विल्हेवाट

लोकनायक वृत्तसेवा/किरण जावळे - आष्टी शहरात गणरायांचे विसर्जन जड अंतकर्णाने साजरे झाले. विसर्जनासाठी नगरपंचायतच्या वतीने कृत्रीम तलावाची निर्मिती करण्यात आली होती.या उपक्रमाला आष्टी करांनी उत्स्फूर्त पणे प्रतिसाद दिली. व नगरपंचायतच्या चोख नियोजनाची स्तुती केली. यावर्षी गणेशत्सवच शहरात मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात आला. लहान,तरूण,वयोवृद्धांनी यामध्ये मोठा सहभाग घेतला.शहरात घरोघरी बप्पांची मुर्तीची स्थापना होतेच परंतु मंडळाचे या पेक्षा मोठमोठ्या बपांच्या मुर्ती असतात. यामुळे यावेळी नगरपंचायतचे सीओ श्री. बाळदत्त मोरे,नगराध्यक्ष जीया बेग, उपनगराध्यक्ष शैलेश




सहस्त्रबुद्धे, इंजि.शिरसाट, कर्मचारी तांबे, दिलीप निकाळजे, संजय निकाळजे व सर्व स्टाफने गणरायांचे विसर्जन योग्यरित्या होवो म्हणून कृत्रीम तलावाची **पान २ वर**

## सुमती पारेकर यांचे वृध्दापकाळाने निधन

किल्लेधारूर - धारूर येथील रहिवाशी सुमती सुमंत पारेकर वय ६० वर्ष यांचे ६ सप्टेंबर २०२५ रोजी अल्पशाह आजाराने डोंबिवली येथे निधन झाले. तेथेच पार्थिवार अंत्यसंस्कार करण्यात आले. त्या मुळ धारूर येथील रहिवाशी होत्या त्याचे पश्चात पती मुलगा सुन नांतवडे असा परीवार आहे त्या सचिन



पारेकर याच्या आई होत्या

## एमआयडीसी रस्त्याला दोनदोन वर्षातच अवकाळा; रस्त्याच्या इंजिनीयरला नोबेल द्यावा

लोकनायक वृत्तसेवा/किरण जावळे - आष्टी शहर ते शिदेवाडी फाटा या दोन किलोमीटरच्या रस्त्यावर तब्बल दीड हजार खड्डे पडल्याने प्रवाशांचा जीव मुठीत आला आहे. खड्डेमय रस्त्यामुळे अपघातांची शक्यता वाढली असून वाहनधारक व स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त





होत आहे. या रस्त्यावरून तब्बल पन्नास गावांतील वाहनधारकांना दैनंदिन प्रवास करावा लागतो. शाळकरी मुले, महाविद्यालयीन विद्यार्थी, शेतकरी, कामगार व नोकरीसाठी जाणाऱ्या प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेष म्हणजे या **पान २ वर**

This Newspaper Printed by Owner , Printer , Publisher **Editor BHARAT DEVIDAS GAIKWAD Chief Editor - Abheejit GAIKWAD** at **Indradhanush Printers and publishers** , Near Post Office , Peth Beed , Khadkpura, Beed 431122 ( Maharashtra ) and Published AT.**The office of Dainik Loknayak** , Near Post Office , Peth Beed , Khadkpura, Beed 431122 ( Maharashtra )

७६ हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक **भारत देविदास गायकवाड,**कार्यकारी-संपादक **अभिजित गायकवाड** यांनी **इंद्रधनुष्य प्रिंटर्स अॅण्ड पब्लिशर्स**, पोस्ट ऑफिसजवळ, पेठ बीड, खडकपुरा, बीड जि.बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक बीडचा लोकनायक कार्यालय, पोस्ट ऑफिसजवळ, पेठ बीड, खडकपुरा, बीड जि.बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले.**निवासी संपादिका सौ .नायरा राज मुळे. पी.आर.बी.कायद्यानुसार ( सर्व वादविवाद बीड न्याय कक्षेत)** Mobile: 9850165082 / 9420406019 **E:mail : dainikloknayak@gmail.com**